ISSN 2349 - 9478

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
YEARLY RESEARCH JOURNAL

# Re-Construction
# Chattrapati Rajshree Shau Maharaj

Volume - I Issue - I May - 2014



Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

ISSN 2349 - 9478

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
YEARLY RESEARCH JOURNAL
**Re-Construction**

# Chattrapati Rajshree Shau Maharaj

VOLUME - I ISSUE - I MAY - 2014 AURANGABAD

* EDITOR *

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

* PUBLISHED BY *

**Ajanta Prakashan**

Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

## CONTENTS


| Sr.No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| 1 | A Brief Sketch of Life and Work of Rajershi Shahu<br>**Dr. Raut Sunil Raosaheb** | 6 |
| २ | राजर्षी शाहू महाराज आणि दुष्काळ<br>**सचिन नागोराव कसबे** | ८ |
| ३ | राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार<br>**डॉ. सुदाम पवार** | ११ |
| ४ | राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार आणि आजची प्रासंगिता<br>**डॉ. पाटील व्ही. एच.** | १४ |
| ५ | राजर्षी शाहू महाराज यांचा आरक्षण विषयक दृष्टिकोन<br>**गाडवे वर्षा शेषराव** | १७ |
| ६ | शाहु महाराज आणि तत्कालीन मुस्लिम समाज<br>**ॲड. एम. एन. शेख** | १९ |
| ७ | छत्रपती शाहु महाराजांनी केलेले सामाजिक महत्वाचे कायदे<br>**प्रा. विनोद पाटील** | २१ |
| ८ | राजर्षी शाहू महाराज : अस्पृश्यता निवारण<br>**डॉ. सत्यपाल कांबळे** | २४ |
| ९ | छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान<br>**काशिदे रावसाहेब चोखाजी** | २७ |
| १० | छत्रीय कुलवतसन सिंहासनाधिश्वर श्रीमंत राजश्री शाहु छत्रपती महाराज साहीब बहादुर यांचे कार्य<br>**तायडे अशोक नामदेव** | २९ |
| ११ | समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज<br>**प्रा.आर.आर.सुरडकर**<br>**डॉ.सुकुमार भंडारे** | ३१ |


**'Re-Construction - राजश्री शाहू महाराज' या वार्षीक प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी स्वत: लेखकावर राहील.**

**हे नियतकालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर अॅण्ड प्रिंटर्स, जयसिंगपूरा, विद्यापीठ गेट, औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.**

Scanned by CamScanner

# २. राजर्षी शाहू महाराज आणि दुष्काळ

**सचिन नागोराव कसबे**

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशार्थ विभाग, श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.

**प्रस्तावना**

आधुनिक भारतीय पुरोगामी राष्ट्रवादाचे जनक कोल्हापूर या संस्थानाचे अधिपती म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय.शाहूंचा जन्म कागलच्या घाटगे कुळात २६ जुन १८७४ साली झाला. त्याचे नाव यशवंतराव असून वडिलांचे नाव जयसिंगराव व आईचे राधाबाई होते. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर महाराणी साहेबांनी यशवंतरावाना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले व शाहू छत्रपती असे त्यांचे नाव ठेवले १८९१साली विवाह झाल्यानंतर इ.स. १८९४ साली कोल्हापूर संस्थानाची अधिकार सुत्रे हाती घेतली. १८९४ ते १९२२ या २८ वर्षांच्या काळात त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा कायापालट केला राज्य हे प्रजेच्या कल्याणासाठी निर्माण करावयाचे असते आणि हे कल्याण प्रजेतील सर्व थरातल्या लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**दुष्काळ**

भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेती ही पावसाच्या पाण्यावर व निसर्गाच्या लहरींवर अवलंबून असल्यामुळे त्यांना दुष्काळ अवर्षणासारख्या समस्येला नेहमी सामोरे जावे लागत आहे. १९व्या शतकात दुष्काळाचे खरे स्वरूप १९७६ ला समोर आले त्यावेळेचा दुष्काळ महाभयंकर होता कारण दोन वर्ष या दुष्काळाने अनेक भागात थैमान घातलेले होते यावर उपाय म्हणून ब्रिटिश सरकारने पावले उचलली होती. त्यापूर्वीही १८९६-९७ च्या काळातील दुष्काळाने हिन्दुस्थानला खाईत लाटले गेले होते. त्यामुळे त्यावेळी प्रत्येक प्रांतात दुष्काळ निवारणार्थ उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी दुष्काळ कमिशनची नेमणूक करून काही शिफारशी सूचवल्या होल्या यासाठी दुष्काळी भागात अन्नधान्य उत्पादनासाठी पाटबंधारे योजना व रोजगार यावरही भर दिला होता.

करवीर राज्यात १८९६ ते १९०० या पाच वर्षांच्या काळात पुर्ण दक्षिणेत हाहाकार झाला व हजारो लोकांचे बळी गेले संस्थानात राजर्षी शाहू गादीवर बसले तेंव्हाच या संकटानी प्रवेश केलेला होता. यातच दुष्काळ व प्लेगसारख्या संकटाचा सामना त्यांना करावा लागला होता. पण शाहूंच्या दूरदृष्टीमुळे या संकटावर मात करून उपाययोजना सुचवल्या त्यामुळे देशातील इतर भागातील जीवितहानीपेक्षा खूपच कमी प्रमाणात जीवितहानी करवीर राज्यात म्हणजे कोल्हापूर भागात झाली.

शाहू महाराजांना शिकारीचा छंद असल्यामुळे ते कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर भागात आपल्या संस्थानातील प्रमुख अधिकाऱ्यांना सोबत घेऊन तेथील भागांची पाहणी केली तसेच त्यांच्याशी गप्पा गोष्टी केल्या तेंव्हा त्यांना जाणवले की या भागात मोठ्या प्रमाणात दुष्काळ आहे. शेतकरी हा शेती कसण्यापासून वंचित आहे. कारण पाण्याची मोठी समस्या या भागातील जनतेला भेडसावत आहे. हे त्यांच्या पाहणी दरम्यान लक्षात आले. तेव्हा त्यांनी आवश्यक त्या ठिकाणी बांधकाम खाते व जंगलखात्याच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन त्यांच्याशी चर्चा केली व राज्याच्या दृष्टिने स्वतंत्र 'दुष्काळ विभाग' सुरू केला यात त्यांनी मुलभूत स्वरूपाच्या तातडीच्या उपाययोजना राबवल्या. त्यामुळे तेथील पशू- पक्षी, प्राणी व मानव यांचे प्राण वाचले जावू लागले. शाहूने कडेकोट पन्हाळा, गडहिंग्लज,वळिवंडे बाजार इ. ठिकाणी गोरगरिबासाठी अन्नधत्रे सुरू केले. अनाथ, वृद्ध व निराधार लोकांसाठी अनाथालये काढली व गरिबांना जीवदान दिले त्यामुळे कोल्हापूर संस्थानाची कामगिरी ही शाहूंची कल्याणकारी राज्यकर्ता म्हणून मोठी कामगिरी समजली जाते.

आमची जनता सदा सर्वदा सुखी असली पाहिजे व आमच्या जनतेला अन्न मिळाले पाहिजे भुकबळी, प्रजानन होता कामा नये याकडे शाहूने लक्ष दिले. शाहूने सधन शेतकरी, शेतमजुर, सावकार यांच्याकडून गरिब जनतेसाठी धान्य गोळा करून त्यांचे दुष्काळी भागात वाटप

Scanned by CamScanner

केले तसेच व्यापाऱ्यांनी त्यांना सहकार्य केले. काही व्यापाऱ्यांना परराज्य व परप्रांतातून धान्य आणण्यासाठी बिनव्याजी कर्ज संस्थानाकडून देण्यात आले. तसेच सरकारकडून धान्य खरेदी करून गावोगावी धान्याची दुकाने सुरू केली. त्यामुळे करवीर संस्थानातील गरिब माणूस शाहूंच्या मदतीमुळे यशस्वी होऊ शकला. दुष्काळी भागात महाराष्ट्र सरकारच्या रोजगार हमी अंतर्गत पाळणा घराची व्यवस्था सुरू केली. दुष्काळ ग्रस्तासाठी आपल्या संस्थानात महाराजांनी कच्चा व पक्क्या रस्त्यांच्या पुलांच्या बांधकामासारख्या विविध योजना सुरू केल्या. करवीर संस्थानात शाहुंनी प्रजेच्या जीवितहिताबरोबर त्यांच्या जनावरांच्या जीवितांची विशेषत्वाने काळजी घेतली. त्यामुळे संस्थानात माणसाबरोबर जनावरे ही जगली व जगवली आज दुष्काळ प्रवण महाराष्ट्रात सरकार ज्या चारा छावण्या उभ्या करत आहे त्यासाठी राजर्षी शाहुंच्या विचारांची प्रस्तुतता दिसून येते.

शाहूंनी आपल्या राज्यात दुष्काळ कायम स्वरूपी कमी झाली पाहिजे. यासाठी १९०२ मध्ये 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहिर करून स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण केले व त्यावर स्वतंत्र इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली. दुष्काळग्रस्त भागातील पाहणी दरम्यान' संस्थानातील पाण्याचा प्रश्न शाहूंनी ओळखून पाण्याचे साठे शोधून जुन्या विहिरींचे पुनरुज्जीवन केले व नोंदी घेतल्यां. विहिरी व तळ्यातील गाळ काढला. बंधारे बांधले या वेगवेगळ्या वेगवान योजनामुळे जमिनीवर पडणाऱ्या व जमिनीखालील पाण्याच्या स्रोताचा मागोवा घेऊन पाण्याची पातळी वाढवली त्यामुळे तेथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटला आणि त्यामुळे मानवासहित मुक्या प्राण्यांचे जीव वाचले हे शाहूमुळेच.

सार्वत्रिक पाटबंधारे योजनेतील सर्वात महत्त्वकांक्षी प्रकल्प म्हणजे भोगावती नदीवर महाराजांनी बांधलेले राधानगरी हे धरण होय. १९०२ साली युरोप दौऱ्यात त्या भागातील मोठी-मोठी धरणे पाहून आपल्या भागातील डोंगर कपारी भागात पडणारे पावसाचे पाणी आडवून संस्थानातील काळ्याभोर जमिनीस दिले गेले पाहिजे असे धोरण आखले व संस्थानात हरितक्रांती स्वप्न पाहून हरितक्रांती घडवली. त्यामुळे शेती नव्हे शेतकरी सुखी व समृद्ध झाला. शाहूंनी आपल्या संस्थानात विदेश- दोऱ्यातून आधुनिक पद्धती निरीक्षणावरून १९१२ साली कोल्हापूरात *'किंग एडवर्ड अॅग्रीकल्चर इन्स्टीट्युटची'* स्थापना केली. या संस्थेला जोडून त्यांनी आधूनिक कृषि अवजारांचे एक कायम स्वरूपी *'म्युझियम'* स्थापन केले. तसेच शेतकऱ्यासाठी विविध प्रर्दशने मेळावे व सभा घेतल्या आणि यातुनच आधुनिक पद्धतीच्या शेतीबद्दल उत्तेजन मिळू लागले. त्याचबरोबर महाराजांनी राधानगरी येथे *'वुड डिस्ट्रीब्युशन फॅक्टरी'* सुरू केली. तसेच स्टेशनजवळ 'शाहूपूरी' बाजारपेठ निर्माण केली. डोंगर भागात चहा, कॉफी, वेलंदोडे, रबर यांचे मळे दिसू लागले. पारंपारिक पिकाबरोबरच नगदी पिकाकडें शेतकरी वळला जी महाराजांची कल्पना होती ती काही प्रमाणात का होईना यशस्वी झाली. शाहूंनी दुष्काळी भागात १९०६ साली.'शाहू छत्रपती स्पिनिंग अॅण्ड *विव्हिंग मिल'* चा पाया घातला. १९०७ मध्ये सहकारी तत्त्वावर एका कापड गिरणीची उभारणी करून रोजगार निर्माण केला. शाहू महाराजांच्या विचारावरुन आणि दुरदृष्टीवरून येथील भागाचा कायापालट झाला. हे सिद्ध होते.

## सारांश

राजर्षी शाहूंच्या दुरदृष्टीमुळे करवीर संस्थानात दुष्काळावर मात करून विविध प्रकारच्या तातडीच्या उपाययोजना सुरू केल्या. व करवीर संस्थानातून दुष्काळाची कायमस्वरूपी हकालपट्टी केली. आज ही महाराष्ट्रात विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात दुष्काळ पडलेला दिसतो. पण कोल्हापूर जिल्ह्याचे नाव दुष्काळग्रस्ताच्या यादीत नाही याचे सर्व श्रेय राजर्षी शाहूंना जाते कारण कोल्हापूर संस्थान व त्यावेळी हिंदूस्थानातील सर्वात मोठी योजना म्हणजे राधानगरी धरण असून शाहूंसाठी ते जीवितकार्य होते या धरणावर आज कोयनेसारखा विजनिर्मिती प्रकल्प सुरु आहे ते शाहूंच्या कल्पनेमुळेच तसेच शाहूंच्या 'पाणी आडवा पाणी जिरवा' या योजनेमुळे व विचारामुळे आज महाराष्ट्रात शाहूंचे विचार उपयुक्त ठरतात. वर्तमान काळात शाहूंच्या विचार अमलात आणले तर संपूर्ण महाराष्ट्र कोल्हापूर जिल्ह्यासारखा सुजलाम-सुफलाम बनलेच हे शाहूंच्या विचारावरून स्पष्ट होते.

Scanned by CamScanner

## संदर्भ

१) 'राजर्षी शाहू राजा व माणूस', कृ.गो. सुर्यवंशी पुणे, १९८४.
२) 'राजर्षी शाहू गौरवग्रंथ', पी.बी. सोळुंके, कोल्हापुर १९७६.
३) 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', डॉ. जयसिंगराव गायकवाड कोल्हापूर २००१.
४) 'श्री. शाहू छत्रपतीचे अर्थकारण', मीना कुलकर्णी, व.शी. कुलकर्णी, कोल्हापुर १९७५.
५) 'राजर्षी शाहू विचार व कार्य', गिरिष मोरे, कोल्हापूर १९८८.
६) 'राजर्षी शाहू छत्रपती', धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई २००१.
७) 'लोकराजा शाहू छत्रपती', जाधव रमेश, सुरेश एजन्सी पुणे, १९८८.
८) 'करवीर रियासत', गर्गे स.मा. कोल्हापुर, २००३.
९) 'राजर्षी शाहू जीवन व कार्य', डॉ. जयसिंगराव पवार, कोल्हापूर, २००२.
१०) 'छत्रपती शाहू स्मृती दर्शन', सोळंके हिंदुराव, कोल्हापुर, १९९८.
११) 'क्रांती सुक्ते राजर्षी छत्रपती शाहू', भोसले एस.एस. महाराष्ट्र राज्य मुंबई, १९९१.

Scanned by CamScanner